*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

# Unit 4

# JAINISM

## जैनदर्शन

1. जैन दर्शनाचे संस्थापक , जैन संप्रदाय
2. अनेकांतवाद आणि स्याद्वाद
3. द्रव्याचे स्वरुप आणि प्रकार :जीव आणि अजीव
4. जीवाचे स्वरुप, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश आणि काल.
5. बंध आणि मुक्ति सिध्दान्त.
6. ज्ञान आणि ज्ञानाचे प्रकार

1

---

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

### प्रस्तावना

**भा**रतातील तीन प्रमुख धर्मापैकी एक म्हणजे जैन धर्म होय.जैन धर्माने मांडलेले तत्त्वज्ञान म्हणजे जैन दर्शन होय.त्यास *जैन मत* असेही नाव आहे. जैन दर्शन हे दुसरे अवैदिक दर्शन होय.ते वेदांपूर्वी निर्माण झालेले अतिप्राचीन दर्शन असावे.जैन दर्शनाने निखालस श्रमणपरंपरा मानवी जीवनात आणली.

जित् (म्हणजे जिंकलेला) या संस्कृत धातूपासून जैन ही संज्ञा बनते. *'जि'* म्हणजे जिंकणे, स्वामित्व मिळविणे.जो इंद्रियांना जिंकतो तो जैन होय.जैन धर्माने ***'तीर्थकर'*** मानले आहेत.तीर्थकर या शब्दाचा मूळ अर्थ मार्ग दाखविणारा.म्हणून जैनमतानुसार संसारसागरातून मुक्तिचा मार्ग दाखविणारा तो तीर्थंकर.असे 24 तीर्थंकर झाले.शेवटचे तीर्थंकर म्हणजे वर्धमान महावीर होय.

### जैन धर्माचे संस्थापक


जैन धर्ममत हे अतिप्राचीन असल्यामुळे कालप्रवाहात ते लुप्त झाले; तेंव्हा भगवान वृषभदेव / ऋषभदेव / ऋषभनाथ यांनी या धर्माचे व तत्त्वज्ञानाचे पुनरूज्जीवन केले.त्यामुळे ऋषभदेवानांच जैन मताचे आद्य प्रवर्तक मानले जाते. वेदांमध्ये आणि श्रीमद्भागवत ग्रंथांमध्ये ऋषभदेवांचे वर्णन येते. ऋषभदेवानांच *आदिनाथ* असेही नाव वैदिक परंपरेत दिले गेले आहे. ऋषभदेवांना शंभर पुत्र होते आणि त्यात *'भरत'* या सर्वात ज्येष्ठ पुत्र होता.आपल्या आध्यात्मिक साधनेमुळे भरत साऱ्या जगात *'जडभरत'* या नावाने प्रसिध्द झाला. भरतामुळे आपल्या देशाला *'भारत'* किंवा *'भारवर्ष'* हे नाव मिळाले.

ऋषभदेवानांच पहिले तीर्थंकर मानले जाते.त्यांच्यानंतर 21 तीर्थंकर होवून गेले.23 वे तीर्थंकर म्हणजे भगवान पार्श्वनाथ.त्यांचा काळ इ.स.पू.आठवे शतक होय. त्यांच्यानंतर 150 - 250 वर्षांनी शेवटचे 24 वे तीर्थंकर म्हणजे भगवान महावीर होय. आजच्या जैन धर्माचे तत्त्वज्ञान या वधर्मान महावीरांनीच मांडले, असे मानले जाते.वधर्मान महावीरांचा जन्म इ.स.पू.599 ला बिहारमधील

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



कुण्डपूर या ठिकाणी राजघराण्यात झाला. त्यांना *जिनदेव* असेही नाव असून जिनदेवाने सांगितलेला तो जैनधर्म असे आज समजले जाते.इतर तीर्थंकरांच्या तुलनेने पार्श्वनाथ आणि महावीर यांचीच माहिती आज बऱ्यापैकी उपलब्ध आहे. वर्धमान महावीर आणि गौतम बुध्द समकालिन होते.




## ग्रंथ आणि भाषा

जैनधर्माच्या मूळ धर्मग्रंथांना *'आगम '* अथवा *' सिध्दान्त '* म्हणतात. ते *अर्धमागधी* या प्राकृत भाषेत लिहीलेले आहेत.अर्धमागधीलाच *'आर्ष'* असेही नाव असून याच भाषेत महावीरांनी उपदेश केला. धर्मग्रंथ या भाषेत असली तरी पुराणे, कथा, प्रवचने,टीकात्मक ग्रंथ,चरित्र इत्यादी जैन वाङमय मात्र *जैन महाराष्ट्री* या भाषेत आहे. ते विपुल आहे. नंतरच्या जैन आचार्यांनी संस्कृत आणि प्राकृत भाषेतही शिष्यांना उपयुक्त विपूल वाङमय निर्माण केले.[1] त्यात मूळ धर्मग्रंथाची संख्या 85 आहे.महावीराच्या निर्वाणानंतर इ.स. पू. चौथ्या शतकात *'पाटली पुत्र'* येथे आगमांना लिखित स्वरुप देण्याचा प्रयत्न झाला. त्यानंतर साधारण 400 वर्षांनी वल्लभी नगरीत निश्चित स्वरुप मिळाले. तेच आज प्रमाण मानले जाते.

आगमांचा पहिला भाग बारा अंगांचा म्हणजे विभागांचा आहे.त्यात आचारांगसूत्र, सूत्रकृतांग व उत्तराध्ययनसूत्र हे तीन महत्वाचे ग्रंथ आहेत.तात्त्विक वाङमय अतिशय उच्च दर्जाचे व विपुल असून विसाव्या शतकातही लेखनाची परंपरा चालू आहे.सातव्या शतकातील कुंदकुंदाचार्यांचे पंचास्तिकायसार,नियमसार, प्रवचनसार, हे ग्रंथ. त्यांचे शिष्य उमास्वाति यांचा तत्त्वार्थाभिगमसूत्र, मल्लीसेनसूरीचे स्याद्वाद मंजिरी नवव्या शतकातील हरिभद्रसूरि यांनी 1444 ग्रंथ लिहिले.त्यात षड्दर्शन समुच्चय हा महत्वाचा आहे.13व्या शतकापासून हिंदी,मराठी,गुजराथी व कानडी भाषेत भरपूर जैन साहित्य निर्माण झाले.मराठी लेखकांमध्ये द.भि.रणदिवे,तात्या पांगळ, हिराचंद नेमचंद शहा, कल्लप्पा निटवे, बाळगौडा पाटिल यांचे लेखन आहे तर वात्विक मीमांसा तत्त्वज्ञानाचे अभ्यासक ग.वा.तगारे, डॉ. शि.स.अंतरकर, डॉ. मीना केळकर, डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांनी केली आहे.

[1]जैन धर्मग्रंथाची भाषा मुळात 'अर्धमागधी' ही असून वैदिकांनी वाद चर्चेसाठी ती संस्कृतमध्ये भाषांतरीत केली.त्यानंतर जैन आचार्यांनी चर्चेसाठी संस्कृतमध्ये ग्रंथरचना केली.

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

## जैन संप्रदाय : श्वेतांबर आणि दिगंबर :

वर्धमान महावीराच्या पूर्वी स्थविरकल्प आणि जिनकल्प असे दोन पंथ होते.स्थविरकल्पी वस्त्रे वापरीत तर जिनकल्पमधील एका शाखेचे लोक निर्वस्त्र राहात असत.महावीराने या दोघांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यावरूनच दिगंबर आणि श्वेतांबर असे पंथभेद झाले.इसवी सनाच्या पहिल्या शतकात हे पंथ निर्माण झाले.

श्वेतांबरामध्ये स्थानकवासी आणि देरावासी असे नवे भेद 17व्या शतकात आले.स्थानकवासी मूर्तीपूजक नाहीत तर देरावासी मूर्तीपूजक आहेत. श्वेतांबरपंथीयांचा ढुंढिया नावाचा आणखी पंथ आहे. दिगंबर आणि श्वेतांबर त्या दोघांमध्ये सैध्दांतिक मतभेद फारच थोडे असून मुख्य फरक असा की,श्वेतांबरपंथीयांच्या मते मूल धर्मग्रंथ म्हणजे साक्षात महावीराची वचने आहेत, असे मानतात; ते दिगंबराना मान्य नाहीत. दिगंबरपंथीयांच्या मते धर्मग्रंथातील तत्वे व आचार यांना मान्यता द्यावी, पण ही प्रत्यक्ष महावीराच्या तोंडची वचने नाहीत.

साधूने वस्त्रांचा संपूर्ण त्याग केला पाहिजे, दिशा एवढेच त्याचे आवरण राहिले पाहिजे असा दिगंबरांचा आग्रह आहे. दिक् + अंबर = दिगंबर, म्हणजे दिशा व आकश हीच ज्याची वस्त्रे तो दिगंबर होय.आणि श्वेतवस्त्रे धारण करतो तो श्वेतांबर होय. साधूने श्वेत वस्त्रे वापरण्यास श्वेतांबरांची अनुमती आहे. स्त्रीला स्त्रीजन्मातून थेट मोक्षावस्थेस पोचता येणार नाही आणि केवल-ज्ञान प्राप्त झालेल्या पुरुषाने इतरांसारखे अन्नग्रहण करण्याची गरज नाही असे दिगंबरांचे म्हणणे आहे तर या दोन्हीही गोष्टी श्वेतांबरांना मान्य नाहीत.

## अनेकांतवाद आणि स्याद्‌वाद (जैनांचे सत्ताशास्त्र )

जैनमत हा एक धर्म आणि दर्शन असे एकाचवेळी दोन्हीही आहे.जैनांच्या मते, वस्तु म्हणजे वास्तव (किंवा सद्‌वस्तू) अनेक बाजूंनी बनलेली असते.कुठल्याही गोष्टीला अनेक बाजू असतात. येथे बाजू म्हणजेच धर्म, त्यामुळे 'वस्तु अनन्त-धर्मात्मक' असते असे जैनांचे म्हणणे आहे. कितीही प्रयत्न केला तरी वस्तुचे आपणांस होणारे ज्ञान नेहमीच अपूर्ण राहात असते.तिचे संपूर्ण स्वरुप कधीही जाणले जावू शकत नाही. आपणांस ज्ञान होते याचा अर्थच नेहमीच ज्ञानात आपण वस्तुस्वरुपाचा कुठला तरी एकच अन्त अथवा शेवट पकडीत असतो.

उदाहरणार्थ समजा, मी म्हटले, ' हे टेबल लाकडी आहे.' हे विधान खरे आहे. पण त्याच्या खरेपणास मर्यादा आहेत.कारण ते कुठल्याही लाकडाचे नाही, तर विशिष्ट अशा सागवानाचे आहे. तो सागवानसुध्दा अमुक एक प्रकारचा आहे.त्यात सुध्दा,अमुक ठिकाणचा,अमक्या झाडाचा, अमक्याने तोडलेला अशी भर घालावी लागेल आणि अशी कितीही भर घातली तरी त्या टेबलाचे संपूर्ण स्वरुप त्यात सामावले जाणार नाही. कारण आणखीही काही अज्ञात बाजू असतातच.त्या जाणल्या जावू शकत नाहीत.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

टेबलाप्रमाणेच जगातील सर्व वस्तू किंवा खुद्द जगच अनेक बाजूंनी बनलेले आहे. हे सारे जगत म्हणजेच वस्तू किंवा सद्वस्तू होय. तेंव्हा वस्तू अनन्तधर्मात्मक असते आणि आपले नेहमीचे ज्ञान मात्र एकान्तक असते.या अनेकांतवादी भूमिकेतूनच काही गृहीततत्त्वे निष्पन्न होतात, ती अशीः


1.सद्वस्तू (Reality) अनेक प्रकारची आहे आणि प्रत्येक प्रकार (किंवा व्यक्ती) दुसऱ्याहून भिन्नच असते.
2.वस्तू जाणली गेली नाही तर ती अस्तित्वात असतेच ! म्हणजे वस्तू ज्ञानप्रक्रियानिरपेक्षपणे अस्तित्वात असते.
3.सद्वस्तू सतत परिवर्तनीय असते पण त्याचवेळी अपरिवर्तनीय असेही काही तत्त्व सद्वस्तूठायी असते.
4.असे अपरिवर्तनीय तत्त्व म्हणजे द्रव्य होय.
5.द्रव्य हे पर्याय आणि गुण यांनी युक्त असते.
6.द्रव्य परिवर्तनीय असल्याने त्यासंबंधी केलेले कोणतेही विधान व ज्ञान नेहमी सत्यच असते.

अन्त म्हणजे कड, शेवट, निश्चित निर्णय अथवा निश्चय होय. एकान्त म्हणजे एक अन्त = एकच एक निश्चय करणे. अनेकान्तवाद म्हणजे अनेक निर्णय घेणे; कुठल्याही गोष्टींसंबंधी एकांतिकपणे मत न बनविणे.त्या ज्ञानवस्तूच्या जास्तीत जास्त बाजू लक्षात घेणे. वस्तूच्या स्वरुपासंबंधीचे आपले ज्ञान 'हत्ती आणि सात आंधळे' या गोष्टीतल्याप्रमाणे नेहमीच एकांगी असणार. ही जाणीव ठेवणे म्हणजेच अनेकान्तवाद पत्करणे होय.

अनेकान्तवाद दृष्टिकोण अथवा वृत्ती आहे.ती बाळगणे ही आधुनिक अर्थाची लोकशाही म्हणता येईल.हा दृष्टिकोण अथवा वृत्ती स्वीकारून जैन तत्त्वज्ञ त्यांचे वस्तुस्वरुप सांगताना नयवाद आणि स्याद्वाद असे दोन सिध्दान्त मांडतात. नयवाद आणि स्याद्वाद ही अनेकान्तवादाचीच रुपे होत.

## नयवाद

नय म्हणजे अंश, अंग किंवा पाहणा-याचा विशिष्ट अभिप्राय. (नयो ज्ञातुरभिप्रायः) कोणत्याही वस्तूचे ज्ञान निरनिराळ्या नयांनी होत असते.त्यापैकी आपण कुठला तरी एकच नय त्या ज्ञानाच्या क्षणाला स्वीकारीत असतो.इतर नयांकडे लक्ष नसते.पण म्हणून कुठलाही एक नय स्वीकारताना इतर नय वगळावयाचे नाहीत हा विचार म्हणजे नयवाद.नयवाद असा शब्द वापरला असला तरी तो कोणताही वाद नाही तर तो ही एक दृष्टिकोणच आहे, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. नयाचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे, -




Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

जैनांच्या मते, जरी कुठल्याही ज्ञेयवस्तूचे ज्ञान केवळ एका नयाने होत असले तरी त्या वस्तूच्या ठिकाणी कोणतातरी नित्य, स्थिर अथवा अढळ, अपरिवर्तनीय असा एक अंश असतो. त्यामुळे 'तीच ही वस्तू' असा पुनःप्रत्यय (प्रत्यभिज्ञा) येतो. उदहारणार्थ कापसाच्या पेळूपासून कापड बनविले तरी त्यातील कापूस हे द्रव्य तेच राहते, ते बदलत नाही. वस्तूकडे पाहताना तिच्यातील हा अपरिवर्तनीय अंशच केवळ लक्षात घेता त्याचे होणारे ज्ञान म्हणजे *द्रव्यनय* (द्रव्यार्थिक) होय. त्याचे नैगमनय, संग्रहनय व व्यवहारनय असे तीन प्रकार आहेत.



पर्याय म्हणजे वस्तूच्या विविध अवस्था. वस्तू अनेक अवस्थात बदलते,त्या वस्तूच्या निरनिराळया अवस्थांना *पर्याय* म्हणतात.ते जाणणे म्हणजे *पर्यायनय* होय.पर्यायनयाचे ऋजुसूत्रनय, शब्दनय, समभिरुढनय एवंभूतनय असे चार पोटविभाग आहेत.

### 1) नैगमयनय

वस्तूचे अत्यंत सामान्य स्वरुप अथवा अत्यंत विशिष्ट स्वरुप जाणणे म्हणजे नैगमयनय. '' मी पुस्तक वाचत आहे' असे आपण म्हणताना खरे तर सगळे पुस्तक नव्हे तर केवळ कुठली तरी एकच ओळ वाचत असतो. पण 'मी पुस्तक वाचत आहे' असे म्हणणे हे नैगमनयाचे उदाहरण आहे. जैनांच्या मते न्यायवैशेषिक दर्शनांत नैगमनयाचा उपयोग केलेला आहे.

### 2) संग्रहनय

केवळ एकच नय जाणत असतानाही सगळीच वस्तू जाणली जात आहे, असा दावा करणे म्हणजे संग्रहनय.वस्तुचे अत्यंत सामान्य स्वरुपच केवळ लक्षात घेणे म्हणजे संग्रहनय.एकच ओळ वाचूनही सगळे पुस्तक वाचत आहे, असे म्हणणे. याचे जैनांच्या मते सर्वात चांगले उदाहरण म्हणजे अद्वैतवेदान्त दर्शनाची रचना होय. या दर्शनाची उभारणी प्रत्येक गोष्टीच्या ठिकाणी असणारा 'अस्तित्व' हा अत्यंत सामान्य धर्मच विचारात घेऊन झाली आहे. म्हणून ते संग्रहनयनाचे उदाहरण होय असे जैन सांगतात.

### 3) व्यवहारनय

एकेक नयाद्वारे सारी वस्तू जाणली जात असतानाही त्या वस्तूच्या विशिष्ट स्वरुपावरच अधिक भर हा व्यवहारनय होय. एकेक ओळ वाचत वाचत सगळे पुस्तक वाचून होते, पण म्हणताना आता एकच ओळ वाचली आहे, असा आग्रह धरत राहाणे. जैनांच्या मते ही प्रवृत्ती सांख्य दर्शनांची आहे.

पर्यायनापैकी तत्वज्ञानाच्या दृष्टीने केवळ ऋजुसूत्रनयच महत्वाचा आहे. शब्दनय इत्यादी तीन नयांना फक्त व्याकरण आणि भाषाशास्त्र यांच्या दृष्टीनेच महत्व आहे. जैनांच्या मते ऋजुसूत्र या पर्यायनयाचा बौध्द दर्शनाने अंगीकार केला आहे. कुठल्याही वस्तूची अगदी एक क्षणपर्यतच टिकणारी अवस्था लक्षात घेऊन तेच वस्तुस्वरुप मानणे म्हणजे ऋजुसूत्रनयाचा अवलंब करणे होय.

## नयाभास

अनेक नय संभवत असता कुठल्या तरी एकालाच घट्ट चिकटून राहणे चुकीचे आहे.या चुकीस नयाभास म्हणतात.तो न्यायदर्शनाच्या हेत्वाभास या संकल्पनेशी जुळणारा आहे.नयाभासापासून अलिप्त राहावे हा अनेकान्तवादापासून निघणारा एक निष्कर्ष होय.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



## स्यात्वाद :-

अनेकांतवादाचे दुसरे स्वरुप म्हणजेच स्यात्वाद होय. स्यात म्हणजे कदाचित, संभवतः. जैनांच्या मते जाणली जाणारी वस्तुस्थिती *'कदाचित अशी अशी असे असेल'* असे सांगणारा वाद म्हणजेच स्यातवाद.संस्कात धातू ' अस् ' म्हणजे असणे याचे विद्यर्थी रूप आहे.स्याद्वाद म्हणजे ' *असेल' - सिध्दान्त* होय.सद्वस्तूचे स्वरूप नेहमीच अत्यंत अनिश्चित असते, असे यातून जैनांना सांगावयाचे आहे.

आपण जे काही सांगतो ते भाषेतूनच सांगत असतो. म्हणून स्यातवाद हा भाषेच्या संदर्भात मांडलेला सिध्दात आहे. भाषा ही विधानांनी बनते. म्हणून स्यातवाद हा एखादे विधान करण्याचा प्रयत्न आहे.

कोणतेही विधान जगासंबधी किंवा जगातील वस्तुसंबधी करावी लागतात. जैनांच्या मते जग आणि जगातील वस्तु यांत नित्य आणि अनित्य (स्थिर व अस्थिर) अशा दोन्ही स्वरुपाच्या आहेत. उदा. टेबल, खुर्ची, इ. अनित्य वस्तु आहेत. वेगवेगळया आहेत. पण लाकुड हे त्यांच्यातील नित्य द्रव्य आहे. तर दुसऱ्या दृष्टिने ते अनित्य आहे. संदर्भ बदलला की, ते अनित्य ठरते.

आपण जेव्हा विधान करतो. तेव्हा मूळ द्रव्याचा विचार करता नित्य स्वरुपाचे विधाने होते. तर संदर्भाचा विचार करता अनित्य स्वरुपाचे विधान होते. टेबल, खुर्ची , इ.मध्ये लाकुड हे मुळद्रव्य आहे व टेबल, खुर्ची इ.संदर्भ आहेत. याचा अर्थ एखादी वस्तु किंवा तिचा गुणधर्म लक्षात घेऊन तिच्यांसंबधीचे विधाने केले तर ते एकत्र विशिष्टय संदर्भात खरे असते. आणि संदर्भ बदलला तर त्या विरुध्द केलेले विधानसुध्दा तितकेच खरे असते. असे स्यातवाद सांगतो.

थोडक्यात, स्यातवाद हा जगाविषयी भाषेतून परस्परविरोधी वाटणाऱ्या परंतु वास्तवात सत्य असणाऱ्या विधानांचा सिध्दांत आहे. अशी विधाने 7 प्रकारची असतात. म्हणून त्यास सप्तभंगी नय म्हणजे 7 प्रकारात मांडलेला दृष्टिकोन असे म्हणतात. ही विधाने पुढील प्रमाणे-

### 1) *स्यात् अस्ति* (कदाचित आहे )

द्रव्य, काल, आकार यादृष्टिने वस्तु अस्तित्वात असते, उदा. माझ्या टेबलावरील पुस्तक कागदाचे (द्रव्य) असून ते माझ्या खोलीत (देश) / (स्थल) या क्षणाला (काल) चौकोनी आकारात (आकार) अस्तित्वात आहे.

### 2) *स्यात् नास्ति* (कदाचित नाही )

वरील संदर्भाच्याच अर्थाने अन्यत्र ती वस्तु अस्तित्वात नसणे उदाः- माझ्या टेबलावरील हे पुस्तक धातुचे (द्रव्य) असून माझ्या खोलीत (स्थल) इतर कोणत्याही वेळेस (काल)कोणताही आकाराचे (आकार) म्हणून अस्तित्वात नाही. म्हणजेच ज्याअर्थी हे कागदाचे पुस्तक आता या खोलीत आहे त्याअर्थी हे कागदाचे पुस्तक इतरत्र कोठेही नाही.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

3) **स्यात् अस्ति च नास्तिच (कदाचित आहे आणि नाही )**

द्रव्य, काल इ. संदर्भात वस्तु अस्तित्वात आहे आणि दुसऱ्या द्रव्य, काल इ. संदर्भात वस्तु अस्तित्वात नाही. हे दोन्हीही खरे आहे. म्हणजे स्वतःचे द्रव्य, काल इ. चा विचार करता वस्तु आहे आणि दुसऱ्या द्रव्य, कालचा विचार करता ती नाही, अशी दोन्ही विधाने खरी आहेत, म्हणजेच एकाच वेळेस स्यात् अस्ति आणि स्यात् नास्ती असे दोन्ही म्हणता येते.



4) **स्यात् अव्यक्तम् (कदाचित वर्णनातीत आहे )**

वरील तीन्ही विधाने आपण एकाच वस्तुबाबत एकामागून एक करता येतात. पण 3 विधाने एकाचवेळी एकाच वस्तुबाबत करता येत नाही. म्हणजेच ते भाषेत व्यक्त करता येत नाही.

5) **स्यात् अस्ति च अव्यक्तम् (कदाचित आहे आणि वर्णनातीत आहे )**

वस्तु स्वतःच्या दृष्टिने अस्तित्वात आहे असे म्हणता येते आणि स्वतःच्या आणि अन्य वस्तुच्या एकत्रित दृष्टिकोनातून अव्यक्त आहे असेही म्हणता येते.

6) **स्यात् नास्ति च अव्यक्तम् (कदाचित नाही आणि वर्णनातीत आहे )**

वस्तु जशी स्वतःच्या दृष्टिकोनातून असते. तशी अन्य वस्तुच्या दृष्टिकोनातून नसते. असे म्हणता येते. म्हणजेच एकाच वेळी स्वतःच्या आणि इतर वस्तुच्या दृष्टिकोनातून ती अव्यक्त असते.

7) **स्यात् आस्ति च नास्तिच अव्यक्तम् (कदाचित आहे, नाही आणि वर्णनातीत आहे )**

स्वतःच्या दृष्टिकोनातून असते. पण अन्य वस्तुच्या दृष्टिने नसते आणि एकाचवेळी एकत्रितपणे दोन्ही दृष्टिने ती अव्यक्त असते.

अशारितीने प्रत्येक वस्तु किंवा कोणतीही वस्तु परस्परविरोधी विधांनामध्ये व्यक्त करता येते. कोणतीही वस्तुच्या बाबतीत तिच्या संदर्भ बदलला तर त्या वस्तुबाबतचे म्हणणे सुध्दा बदलते. असे जैन दर्शन सांगते.

जैनांचा नयवाद आणि स्यात्वाद यांनी मिळून बनणाऱ्या अनेकांतवादावर जबरदस्त टीका झाली. शंकराचार्य आणि रामानुजाचार्थ यांनी जोरदार आक्षेप घेतले आहेत व त्यातील त्रुटी दाखविल्या आहेत.

जैनांचा अनेकांतवाद हा प्राचीन काळी भारतात मांडण्यात आलेली भाषेचे किंवा विधानांचे तर्कशास्त्र आहेत. भाषा आणि जग यांचे नाते काय असते? काय असावे. ते कसे गुंतागुतीचे आहे. याची उकल स्यातवाद करतो.गेल्याकाही शतकांमध्ये या पध्दतीचे विधानांचे तर्कशास्त्र पाश्चात्य तत्ववेत्यानी मांडले.आश्चर्य कारकरित्या त्यांनी मांडलेले तर्कशास्त्र आणि जैन दर्शनाने मांडलेले तर्कशास्त्र जवळपास एकच आहे.

जैनांचे (भारतीयांचे ) वैशिष्टये आणि बुध्दीवैभव इतके अपार,विपुल आहे की जैनांनी हे तर्कशास्त्र हजारो वर्षांपूर्वी मांडले.पण वर्ण जाती व्यवस्था, स्त्री-पुरुष, विषमता, अज्ञान, अंधश्रध्दा इ.मुळे आपलेच वैभव आपणास कळु शकले नाही. हे आपले दुर्दैव आहे.


Department Of Philosophy, Sangamner College Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



## द्रव्याचे स्वरुप आणि प्रकार :जीव आणि अजीव

गुण आणि पर्याय यांनी युक्त द्रव्यपदार्थ अथवा सद्‌वस्तूचे जैनींी जीव आणि अजीव असे दोन तत्वांत विभागून प्रत्येकाचे आणखी प्रकार आणि उपप्रकार केलेले आहेत.




जीव आणि अजीव हे वर्गीकरण ज्ञाता आणि ज्ञेय, दृक् आणि दृश्य किंवा जाणीव आणि जाणिवेचे विषय होणारे सर्व पदार्थ अशा पारंपरिक ज्ञानमीमांसेच्या (epistemological) पध्दतीने केलेले नाही.माणसाच्या अनुभवक्षेत्रात जितक्या म्हणून वस्तू अथवा द्रव्यपदार्थ आहेत त्या जीव अथवा अजीव यांपैकी काहीतरी एक असतात. जीव म्हणजे जाणीव असणारी द्रव्ये व अजीव म्हणजे जाणीव नसणारी द्रव्ये. त्यांचे स्वरूप असे :

## जीव

### *जीवांची अनंतता*

जीव म्हणजे देह व इंद्रियांहून भिन्न असा आपला आत्मा. तो दुस-या आत्म्याहून मूलतः भिन्न आहे. (अद्वैतवेदान्त दर्शनाच्या मते निरनिराळे जीव परस्परांहून भिन्न दिसले तरी मुळात आत्मतत्व एकच आहे.) पण जैनांच्या मते प्रत्येक जीव दुस-या जीवाहून स्वतंत्र आहे. जीव अनंत आहेत.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

## जीवाचे स्वरुप

### अनंतज्ञान, अनंत दर्शन, अनंत वीर्य आणि अनंत सुख




जैनांच्या मते मूलतः प्रत्येक जीवाचे ज्ञान अनंत आहे.संबंध विश्व प्रत्येक जीवाच्या ज्ञानात सामावलेले आहे.तो या विश्वाचे जे दर्शन घेतो ते ही साहजिकच अनंत दर्शन असते. दर्शन म्हणजे सर्वसाधारण स्वरुपाचा बोध व ज्ञान म्हणजे सविशेष प्रत्यय. ज्ञान होताना जीवाला विषयाचा आणि स्वतःचाही (ज्ञात्याचा) प्रत्यय येत असतो.जीवाचा स्वभाव नुसता अनन्त दर्शन आणि अनन्तज्ञान एवढाच नाही.तो अनन्तवीर्य आणि अनन्तसुखही आहे. वीर्य याचा अर्थ कर्माचे आवरण बाजूस काढून स्वतःची मूळ स्थिती म्हणजे केवलपणा अथवा मोक्ष प्राप्त करुन घेण्याची जीवाची कुवत.ती अनन्त आहे. असा जीव अनंतसुख भोगणारा आहे. पण केवळ केवलि-स्थितीत जीव मूळच्या अनन्तसुखाचाही अनुभव घेतो. जीवाचे हे मूळ स्वरूप आहे.पण जीवावर कर्माचे आवरण पडलेले असते.या कर्माचे कण असतात.कर्मामुळे तो मूळ स्वरूप हरवितो आणि कर्मबंधात अडकतो.

### जीवाचे मूर्तिमत्व

मूलतः मुक्त जीव अमूर्त असतो. पण कर्माचे लेप बसून व्यवहारतः तो मूर्तिमान होतो. कर्मबंधामुळे त्याच्या ठिकाणी रुपरसगंधस्पर्शादी गुण उमटतात. मूर्तिमान असणे म्हणजे विविध इंद्रियांच्या प्रत्ययास येणा-या विविध गुणांचा आश्रय असणे.जीव हा शरीराएवढा असतो, तो सर्व शरीर व्यापून राहतो.संसारी जीव व्यवहारतः शरीराएवढाच मानावा, कारण तीच त्याच्या जाणिवेची मर्यादा, आणि जाणिवेची मर्यादा तीच जीवाची मर्यादा असते.शरीर लहानमोठे होईल तसे जीवाचेही परिमाण बदलते. मरणोत्तर जीव एक शरीर सोडून दुस-या शरीरात प्रवेश करतो तेव्हाही आकुंचन अथवा प्रसरण पावून तो नव्या शरीराएवढा होतो.

### जीवांचे प्रकार




Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

## निगोद

वरील प्रकारच्या जीवांशिवाय निगोद नावाचा आणखी एक अतिशय सूक्ष्म असा जीवप्रकार मानला आहे.त्याला कुठलेच इंद्रिय नसते. अनेक निगोद जीवांचे मिळून श्वसन आणि पोषण एकत्रच होत असते. संसारी जीवांपैकी काही मुक्त होऊन जगातून निघून जातात तेव्हा त्यांची पोकळी निर्माण होतात. ती जागा भरुन काढण्यासाठी या निगोदांपैकी काही संसारचक्रात येतात.



संसारी म्हणजे एका जन्मातून दुस-या जन्मात सरत असणारे, संसरणारे, मुक्त म्हणजे या संसरणापासून मोकळे झालेले.संसारी जीवांच्या सुखदुःखांविषयी सदैव उदासीन असतात ते *सिध्द जीव* . पण जे संसारी जीवांना काही काळ तरी मार्गदर्शन करतात ते *तीर्थंकार* किंवा *अर्हत्.*

संसारी जीवांचे त्रस आणि स्थावर असे प्रकार आहेत. त्रस म्हणजे एका जागेहून दुस-या जागेकडे हलणारे. त्यांचे द्वींद्रीय, त्रींद्रिय, चतुरिंद्रिय, पंचेद्रिय व समनस्क असे पाच प्रकार केले आहेत. गांडुळासारख्या प्राण्यांना स्पर्श आणि रसना अशी दोनच इंद्रिये असतात, मुंगी, ढेकूण वगैरेसारख्या कीटकाना स्पर्श, रसना आणि घ्राण अशी तीन . डास, मधमाशी यांसारख्या प्राण्यांना स्पर्श, रसना, घ्राण आणि चक्षू अशी चार, गाय घोडा यासारख्या पृष्ठवंशीय प्राण्यांना या चारीशिवाय श्रवण हे पांचवे इंद्रिय असते. मनुष्य, देव व अधोलोकनिवासी यांना पाच इंद्रियांशिवाय मन व विचारशक्ती ही असतात.

वनस्पती 'स्थावर' या वर्गात मोडतात. वनस्पतींना स्पर्श हे एकच इंद्रिय असते.लाजाळूच्या झाडास स्पर्श झाला की, सबंध झाड पाने मिटून घेते. पृथ्वी, जल, अग्नी व वायु ही ज्यांची शरीरे आहेत असेही जीव आहेत, ते एकेंद्रिय असून स्थावर या प्रकारांत मोडतात.

## अजीवांचे प्रकार

पुद्गल हे पहिले अजीव द्रव्य होय. *'पूर्यन्ते च गलन्ति च'* अशी त्या शब्दाची त्युत्पत्ती आहे. त्याचा अर्थ 'एकसारखी ज्यांची हालचाल सुरु आहे, ज्यांच्यात नेहमी घडामोड सुरु आहे ते-' असा होतो.पुद्गलांच्या ठिकाणी परिस्पंद आणि परिणाम अशा दोन प्रकारच्या क्रिया सुरु असतात.परिस्पंद म्हणजे नुसतीच हालचाल किंवा स्पंदन.परिणाम म्हणजे गुणांत व पर्यायांत बदल होणे. प्रत्येत पुद्गलाच्या ठिकाणी स्पर्श, रस, गंध व रुप (रंग) हे चारही गुण असतातच.उमास्वातींनी पुद्गलांची व्याख्याच मुळी 'स्पर्श-रस-गंध-वर्णवन्तः' अशी केली आहे.

जगातील निरनिराळे अचेतन पदार्थ बनताना या पुद्‌गलांचे एकत्रिकरण होते, त्यांना **संघात** म्हणतात. दोन परमाणू एकत्र येऊन त्यांच्यातील एकाच्या अथवा दोहोंच्या चिकटपणामुळे संघात बनतो. या संघातास *स्कंध* म्हणतात. या स्कंधाचे अधिक मोठे स्कंध बनतात व त्यांच्या निरनिराळया रचनामुळे नवीन गुणांची आणि पर्यायांची उत्पत्ती होत असते. पुद्गल द्रव्यांत स्थुल, सूक्ष्म, सूक्ष्मतर असे फरक आहेत. कर्म हे पुद्गलरुप असून त्याचे परमाणू अतिशय सूक्ष्म असतात. मृत्यूनंतर जीव स्वतःच्या कर्माचे बनलेले कार्मण शरिर घेऊनच दुस-या स्थूल शरीरांत प्रवेश करतो. सांख्य किंवा वेदान्ती यांचे लिंग शरीर आणि जैनांचे कार्मण्य शरीर ही जवळजवळ सारखीच आहेत.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

पुद्गलास आकार असतो, म्हणून सहा द्रव्यांपैकी पुद्गल हे एकच मूर्त द्रव्य होय. शिवाय ते सक्रिय आहे. जीव आणि पुद्गल ही दोनच सक्रिय द्रव्य होय.

## धर्म आणि अधर्म

धर्म आणि अधर्म यांचे नेहमीचे म्हणजे 'सदाचार' व 'दुराचार', 'कर्तव्य' आणि 'अकर्तव्य' नाही. ही दोन तत्त्वे असून ती दोन्ही क्रियाहीन व अमूर्त द्रव्ये आहेत. त्यांचे साक्षात ज्ञान केवलीला आणि मुक्त जीवालाच होते. ही द्रव्ये सर्व लोकाकाश भरुन टाकतात. लोकाकाशाच्या पलीकडे अलोकाकाश आहे. तेथे धर्मही नाही व अधर्मही नाही. नुसती पोकळी आहे.

धर्मद्रव्य गतीस सहायक आहे. याचा अर्थ ते गतीस प्रेरणा देते असा नव्हे. स्वतः उदासीन असून ते गतीस उपकारी आहे. पाण्यामुळे माशांना इकडेतिकडे हिंडणे शक्य होते हे खरे. पण पाणी काही स्वतःच माशाला ढकलत नाही. धर्माचेही तसेच आहे. पुदगलस्कंधाच्या आणि जीवाच्या गती धर्मामुळे शक्य होतात. पण धर्मामुळे त्यांच्या गती उत्पन्न होत नाहीत.थोडक्यात धर्म हे विश्वातील गतिचे उदासीन पण अनिवार्य कारणतत्त्व आहे.

अधर्मद्रव्य हे स्थिरतेचे, स्थितीचे उदासीन कारण आहे. वृक्षाची छाया पांथस्थाला बळेच रोखून धरत नाही. तरीही श्रान्त पांथस्थ वृक्षांच्या छायेमुळे वृक्षाखाली विश्रान्तीस थांबतोच. अधर्म द्रव्याचे कार्य याच त-हेचे घडते.

धर्म आणि अधर्म ही द्रव्ये अस्तित्वात नसती तर जैन दर्शनाच्या मते विश्वात काही व्यवस्था राहिली नसती. निरनिराळया पदार्थांच्या गतीत आणि स्थितीत जे परस्परपूरकत्व आणि सहयोगित्व आहे ते मिळाले नसते. सर्व पदार्थ एकत्र येऊन त्याचा एक गठ्ठा तरी झाला असता किंवा स्फोट होत राहिले असते किंवा ते अत्यंत दूर दूर फेकले गेले असते.

## आकाश

आकाश प्रदेशांचे बनते.एका पुद्गल परमाणूमुळे जेवढी जागा व्यापली जाते त्यास एक प्रदेश म्हणावयाचे. इतर द्रव्य पदार्थांना अवकाश करुन देणे, त्यांच्या अवगाहनास सहायभूत होणे हे आकाशाचे कार्य. आकाशाचे लोकाकाश आणि त्याच्यावर अलोकाकाश असे दोन भाग आहेत. अलोकाकाशात काहीच नाही. ती नुसती अखंड पोकळी आहे त्यात धर्म आणि अधर्म ही द्रव्ये नसल्याने त्यात पदार्थाच्या गतीची आणि स्थितीची शक्यताच नाही.

असे अलोकाकाश जैनांनी मानले तरी कशाला? याचे एक उत्तर पुढीलप्रमाणे देता येईल : जीवाच्या ठिकाणी एक स्वाभाविक ऊर्ध्वगती असते. कर्माच्या दडपणामुळे या गतीस विरोध होतो. जसजसे कर्माचे लेप नाहीसे होतील, तसतसा जीव वर जाऊ लागतो. मुक्तावस्थेत सर्वच कर्मे नष्ट झालेली असतात. म्हणून मुक्त जीव अविरोधपणे हैड्रोजनने भरलेल्या फुग्यासारखा वर जाऊ लागेल. पण मुक्त जीवास अशी अखंड गती मानणे अनिष्ट आहे. अविचलता, स्थिरता, साम्यावस्थता यांहून मोक्षावस्था वेगळी नसते.धर्म व अधर्मांनी विरहित असे अलोकाकाश मानले म्हणजे मुक्त जीव लोकाकाशाच्या वर येऊन. (घराच्या छताशी भिडल्यावर हैड्रोजन फुगा तटून राहतो त्याप्रमाणे ) स्थिर होतो.जीवाची स्वाभाविक गती ऊर्ध्व असल्याने लोकाकाशाच्या सीमेवरुन तो परत खाली संसारात


Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

येण्याचा धोका नसतो. तसेच अलोकाकाशात धर्मद्रव्य नसल्याने लोकाकाशाच्या सीमेवर त्याची गती आपोआपच थांबते.

## पंचास्तिकाय

जीव, पुद्‌गल, धर्म, अधर्म व आकाश या पाच द्रव्यांना अस्तिकाय म्हणतात. पाच आहेत म्हणून पंचास्तिकाय.अस्तिकाय याचा अर्थ जे अस्तित्वात आहे व शरीराप्रमाणे जे अनेक प्रदेशांत राहते ते .

## काल



काल हे सहावे द्रव्य अस्तिकाय नाही. कारण, त्याचे अणू एकमेकांना चिकटून त्यांचा शरीराप्रमाणे अनेक प्रदेशांत राहणारा संघात बनत नाही. रत्नराशीतील प्रत्येक रत्नाप्रमाणे कालाचे अणू एकमेकांपासून विलग राहतात. इतर द्रव्यांना लांबी, रुंदी, उंची अशा अनेक मिती (dimensions) असतात तशा कालाला नसतात. त्यास फक्त एकच मिती असते. कालाचे अणू उभ्या दो-यात मणी ओवावेत त्याप्रमाणे एकापुढे एक उभे येत असतात. एकाशेजारी एक असे आडवे नसतात.

कालद्रव्यामुळेच पदार्थात बदल अथवा विकार घडून येतात, पदार्थ परिणाम पावतात, तसेच पदार्थ परिणाम पावून त्याच्या गुणांत फरक पडला तरी तोच हा पदार्थ अशी प्रत्यभिज्ञा येते तीही कालद्रव्यामुळेच.दिवस, रात्र, महिना, वर्षे असा खंडरुपांनी जो काल आपल्या प्रत्ययास येतो त्यास ***समय*** म्हणतात.

वरील त-हेने सर्व कर्माचाा समूल नाश झाला व नवीन कर्माचा आस्त्रव थांबला म्हणजे जीवाची जी अवस्था होते तोच मोक्ष होय. या अवस्थेत कर्माची बंधने गळून पडली असल्याने जीव आपल्या स्वाभाविक ऊर्ध्वगतीने लोकाकाशाच्या सीमेवर जाऊन स्थिर होतो. तेथे आपली मुळची अनन्तदर्शन, अनन्तज्ञान, अनन्तवीर्य व अनन्तसुख ही स्थिती अनुभवतो. या स्थितीत बदल घडत नाहीत असे नाही. कारण, तसे झाल्यास 'गुणपर्यायवद् द्रव्यम्' ही व्याख्या लागू न पडल्याने जीवाचे द्रयत्वच जाईल. म्हणून मोक्षावस्थेतही आत्म्याचे अवस्थांतर घडत असते असे मानले आहे. पण प्रत्येक अवस्था अथवा पर्याय तंतोतंत दुस-या अवस्थेसारखाच असल्याने आपल्या दृष्टीने ते अवस्थांतर नसल्यासारखेच होते इतकेच.

## बंध आणि मुक्ति : त्रिरत्न सिध्दांत

मूलतः अनंतज्ञान, अनंत दर्शन, अनंत वीर्य आणि अनंत सुख स्वरूप असणारा जीव बंधात अडकतो ते कर्मामुळे. बंध म्हणजेच कर्मबंध.आता, मुक्ति हेच जीवाचे परमप्राप्तव्य आहे. मोक्षाचे साधन कोणते ? तर जैनांच्या मते त्रिरत्न हा एकमेव मोक्ष मार्ग होय. सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान व सम्यक चारित्र या तिन्हीनी मिळून मोक्ष मार्ग बनतो.त्यांना रत्नत्रय, त्रिरत्न किंवा ***त्रिरत्न सिध्दांत*** असे म्हणतात. त्याचा अर्थ पुढीलप्रमाणे.

### अ) सम्यक दर्शन :

संसारी जीवांना मोक्षासाठी मार्गदर्शन करणारे ते तीर्थंकर सर्वज्ञ असतात.त्यांच्या शिकवणूकीवर मार्गदर्शनावर आणि त्याच्या सर्वज्ञतेवर श्रध्दा ठेवणे म्हणजे सम्यक दर्शन होय.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

### ब) सम्यक ज्ञान :

जैन दर्शन या विश्वाचे वर्गीकरण जीव आणि अजीव असे करते .जीव म्हणजे आत्मा आणि अजीव निर्जीव जग.उदा. पृथ्वी, आकाश, काल इ. या जीव - अजीवांचे ज्ञान म्हणजे सम्यक ज्ञान.

### क)सम्यक चारित्र :


सम्यक दर्शन आणि सम्यक ज्ञान या दोन्हीच्या आधारे चांगले आचरण करणे, अहिंसा वगैरे व्रताचे पालन करणे म्हणजेच सम्यक चारित्र होय. त्याचे पालन करणे म्हणजे मोक्षाला जाणे होय. असे जैन दर्शनाकार मानतात.जैनाच्या त्रिरत्न सिध्दांत आणि वैदिक तत्वज्ञानातील ज्ञानमार्ग, भक्तीमार्ग आणि कर्ममार्ग या त्रिमार्गाशी समन्वय झाला आहे असे म्हणता येईल.



सम्यक्चरित्रात म्हणजेच सद्वर्तनात, व्रत, समिती आणि गुप्ती यांचा समावेश होतो. अहिंसा, सूनृत (सत्य), अस्तेय, ब्रम्हचर्य व अपरिग्रह ही पाच व्रते होत. अहिंसा म्हणजे कुठल्याही जीवास इजा न करणे इतकाच अर्थ नाही. प्राणिमात्रावरील प्रेम असा अहिंसेचा भावात्मक अर्थ आहे. अहिंसकाने कोणासही शरीराने, मनाने अथवा उक्तीने दुखवावयाचे नाही. मनानेही दुखवावयाचे नाही, याचा अर्थ मनापासून प्रेम करावयाचे असाच होतो. सूनृत म्हणजे खरे बोलावयाचे इतकेच नव्हे तर ते यथार्थ भाषण मृदु आणि प्रियही असावयाचे. अस्तेय म्हणजे जी वस्तू आपली नव्हे तिचा स्वीकार न करणे. ब्रह्मचर्य म्हणजे केवळ शरीरानेच नव्हे तर मनाने आणि वाणीनेही कामप्रवृत्तीला अवसर न देणे. अपरिग्रह म्हणजे कशाचाही संग्रह न करणे.

## जैनांची ज्ञानमीमांसा : ज्ञान आणि ज्ञानाचे प्रकार

जैनांच्या मते ज्ञान हा जीवाचे स्वरूप आहे. पण ज्ञेय वस्तूचे अस्तित्व आणि तिचे स्वरुप जीवास तिच्या होणा-या ज्ञानावर अवलंबून नाही. ज्ञान हा जीवाचा स्वभाव आहे.त्यास सर्व वस्तूंचे प्रत्यक्ष ज्ञान होते. कारण तो मुक्त केवली असतो. केवलीच्या कर्माचा नाश झाला असल्याने त्याचे ज्ञान थेट ज्ञेय वस्तूंशी जाऊन भिडते. साहजिकच ज्ञानाचे दोन मुख्य प्रकार ठरले, प्रत्यक्ष आणि परोक्ष.




मतिज्ञान म्हणजे आपले व्यवहारातील नित्याचे ज्ञान.श्रुतज्ञान म्हणजे वाचलेल्या अथवा ऐकलेल्या शब्दावरुन मिळणारे ज्ञान.उदहारणार्थ धर्मग्रंथ.

Department Of Philosophy Sangamner College Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



## प्रत्यक्ष ज्ञानाचे तीन प्रकार

## (1) अवधी, (2) मनःपर्याय, आणि (3) केवल.

### अवधी

- म्हणजे ठराविक कालमर्यादेतील आणि ठराविक प्रदेशांतील वस्तूंचे इंद्रियांच्या साहाय्याविना होणारे ज्ञान.आजच्या मानसशास्त्रात यास clairvoyancne म्हणतात. भारतात राहून अमेरिकेतील वस्तूचे ग्रहण मला होऊ लागल्यास किंवा भूतकाल भविष्यकालाचे मर्यादित ज्ञान होऊ लागल्यास ते ज्ञान इंद्रियांच्या मदतीवाचूनच झाले असे म्हटले पाहिजे. म्हणून त्यास प्रत्यक्ष म्हणावयाचे. मोक्षमार्गावर जीवाची प्रगती होऊ लागली म्हणजे काही एका टप्प्यावर जीवास हे सामर्थ्य प्राप्त होते असे जैनांचे म्हणणे आहे.

### मनःपर्याय

- म्हणजे दुस-याच्या मनोव्यापाराचे साक्षात ज्ञान होणे. आजच्या मानसशास्त्रात यास telepathy म्हणतात. मोक्षमार्गावर आणखी प्रगती होऊ लागल्याचे हे चिन्ह असते.

### केवलज्ञान

कर्माचा नाश झाल्यावरच जीवास केवलज्ञान प्राप्त होते. केवलज्ञानात सर्व कालांतील, सर्व स्थलांतील सर्व स्थूल वस्तूचा सतत प्रत्यय येत असतो. तेच अनन्त ज्ञान होय. इतर सर्व ज्ञान सापेक्ष असते, त्यास नय असतात, ते अनेकान्त असते. पण केवलज्ञान हे निरपेक्ष, नित्य व अबाधित असते.

## तीन ज्ञानसाधने

ज्ञानाचे साधन केवळ प्रत्यक्षानुभव आहे, ही चार्वाकांची भूमिका जैन नाकारतात.त्यांच्या मते .केवळ प्रत्यक्षानुभवच स्वीकारल्यास आपले ज्ञान मर्यादित राहील.आपले ज्ञान प्रत्यक्षानुभवाने सुरु होते, हे खरे.पण आपण अनुमान आणि शब्द यांच्यापासूनही ज्ञान मिळवित असतो.त्यामुळे त्यांनाही ज्ञानाचे साधन मानलेच पाहिजे.अनुमान म्हणजे खरा ठरणारा अंदाज आणि शब्द म्हणजे विश्वासू व्यक्तिच्या बोलण्यावर विश्वास ठेवणे.आपले दैंनदिन ,वैज्ञानिक आणि तत्त्वज्ञानात्मक ज्ञान आपण या सर्व ज्ञानसाधनांमार्फत मिळवितो.अशा रितीने जैन दर्शनाच्या सिध्दसेन दिवाकर या आचार्याने **प्रत्यक्षानुभव,अनुमान आणि शब्द** अशी तीन ज्ञानसाधने स्वीकारली आहेत.

## जैनांचा निरीश्वरवाद

जैन दर्शन ईश्वर मानत नाही.पण चार्वाकांच्या निरीश्वरवादापेक्षा जैनांचा निरीश्वरवाद वेगळा आहे.त्यांच्या मते तीर्थंकर हेच देवाच्या जागी मानले पाहिजेत.कारण तीर्थंकर मानवाला मुक्तिचा मार्ग दाखवितात.तेच जीवनाचे आदर्श आहेत.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

**परीक्षण :**

जैनमताकडे धर्म या दृष्टीने पाहता **'अहिंसा'** हे त्यांचे प्रधान तत्व आहे. तर तत्वज्ञान या दृष्टिने पाहता **अनेकांतवाद** हा त्यांचा गाभा आहे. अनेकांतवादात ज्ञानशास्त्र आणि सत्ताशास्त्र दोन्हींचा समावेशही आहे.नयवाद हे ज्ञानशास्त्र आहे तर स्यात्वाद हे सत्ताशास्त्र आहे (किंवा भाषेचे तत्वज्ञान आहे.) अनेकान्तवाद हा एखादा वाद किंवा सिध्दान्त नसून जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आहे.अहिंसा या मूलभूत प्रेरणेतून अनेकान्तवादाचा जन्म होतो.



**अहिंसेचे दोन अर्थ होतात :**

पहिला, हत्या न करणे आणि
दुसरा, केवळ हत्या न करणे एवढेच नव्हे, तर दुस-या जीवावर प्रेम करणे.

अनेकांतवादात बौध्दिक पातळीवरील अहिंसा किंवा भिन्नमतसहिष्णुता दिसून येते.




Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner